Estd. 1962
NAAC'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**१५/२०२१**

**विषय -** **कार्यालयीन उपस्थितीबाबत**

**संदर्भ-** १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक १५ मार्च, २०२१.
२. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि-१/५२६९ दि.१६ मार्च, २०२१
३. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/८९/२०२१ दि.१६/०३/२०२१

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत असलेने कोविड- १९ विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी आणि तातडीने काही उपाययोजना करण्यासाठी व काही सुचानांचे काटेकोर पालन करण्यासाठी उपरोक्त सदंर्भीय पत्राअन्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदर आदेशामध्ये दिलेल्या सुचनाच्या अनुषंगाने विद्यापीठातील अधिविभाग यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय तसेच प्रशासकीय विभाग यांच्या प्रशासकीय कामकाजाकरिता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी विभाग वगळता इतर प्रत्येक अधिविभाग / प्रशासकीय विभागातील विभाग प्रमुख यांनी अधिविभाग / विभागातील शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांपैकी **५०%** याप्रमाणे शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना आळीपाळीने **(Rotation)** कार्यालयात बोलावून शैक्षिणिक व प्रशासकीय कामकाज करुन घेण्यात यावे. ज्या शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळेल त्यांनी घरी राहून **(Work From Home)** कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये.

२. संबधित अधिविभाग प्रमुख / प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी शैक्षिणिक, परीक्षेसंबधित, तसेच आर्थिक वर्ष समाप्तीच्या अनुषंगाने कामकाजावर कोणतीही अडचण निर्माण होणार नाही यांची दक्षता घेवून उपस्थिती निश्चित करावी.

३. उर्वरित शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांची सेवा आवश्यक वाटल्यास त्यानूसार त्यांनी संबधित शिक्षक / अधिकारी/ प्रशासकीय सेवकांना बोलविल्यास त्यांनी कार्यालयात उपस्थित रहाणे अनिवार्य राहील. सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांनी कार्यालयास दिलेल्या त्यांच्या मोबाईल क्रमांकावर उपलब्ध रहावे.

४. उपरोक्त नूसार संबधित विभाग प्रमुख यांनी विभागातील प्रत्येक शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक हे एका आठवडयामध्ये **५०%** कार्यालयात उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

५. अधिविभाग / विभाग प्रमुख यांनी उपस्थित शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांची उपस्थित दिवस व कामाचे स्वरुप यांच्या नोंदी (रोस्टर) अद्यावत ठेवाव्यात.

६. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी कार्यालये (सुरक्षा विभाग, आरोग्य विभाग व अभियांत्रिकी इ. अंतर्गत असलेली अत्यावश्यक सेवा) पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.

७. कार्यालयात उपस्थित राहणा-या सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक यांनी शासनाने वेळोवेळी कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासन, जिल्हा प्रशासन व विद्यापीठ कार्यालयाने निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

८. सदरचे आदेश दि.३१ मार्च, २०२१ पर्यंत लागू राहतील.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर )**
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 884
**दि.** 18 MAR 2021

**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.